# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०५/२०२४ (गुरूवार) सकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
### वाहनासह एकुण २०,७८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ३०/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे पारशिवनी हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, १४ चक्का एलपी गाडी आमडी फाटयाकडुन कन्हान मार्ग नागपूर कडे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) एलपी गाडीमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून जबलपूर ते नागपूर मेन हायवे रोडवर मौजा आमडी येथे अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी करून १४ चक्का टाटा कंपनीची एल पी गाडी क्र. एम.एच—४९/बि.झेड— ०३५७ चा चालक **आरोपी नामे—शाहीद खान, अयात खान, वय ३० वर्ष, रा. ताज नगर वार्ड क्र. ०२, ता. जि. अमरावती** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे १४ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १४ चक्का टाटा कंपनीची एल पी गाडी क्र. एम.एच—४९/बि.झेड— ०३५७ किंमती **२०,००,०००/—रू.** मध्ये १४ ब्रास रेती किंमती ७०,०००/—रू. वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती ८०००/—रू. असा एकुण वाहनासह २०,७८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे—१) शाहीद खान, अयात खान, वय ३० वर्ष, रा. ताज नगर वार्ड क्र. ०२, ता. जि. अमरावती व मालक नामे— २) नदीम बेग काझी, रा. जमील कॉलनी जवळ अमरावती** यांचेविरुद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे पारशिवनी येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी ट्रक चालक यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी, पोहवा ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर